महाराष्ट्र शासन

**विभागीय शिक्षण उपसंचालक,पुणे**
विभाग पुणे-१ यांचे कार्यालय,
**१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लालदेवळासमोर,पुणे-४११ ००१**

w'site : www.dydepune.co.in
e-mail 11thonlineadmissiondydpune@gmail.com
Phone : (020) 26122217

जा.क्र.शिउसं/पुवि /उमाशि/४०१/११ वी प्रवेश /२०२३/ 1152 दि.२३/०५/२०२२

**परिपत्रक** 23 MAY 2023

प्रति,
**मुख्याध्यापक /प्राचार्य,**
पुणे व पिंपरी -चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील
उच्च माध्यमिक विद्यालये/ कनिष्ठ महाविद्यालये (सर्व)

**विषय:-इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन२०23-24 संदर्भात कनिष्ठ महाविद्यालयांच्या रजिस्ट्रेशन व व्हेरिफिकेशन शिबिरासाठी उपस्थित राहणेबाबत**

**संदर्भ:**-मा. शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य.) यांचे पत्र क्र.विद्या-ए-१/११ प्रवेश/२०२३/ दि.१६/०५/२०२२

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की राज्य मंडळाच्या इ. १० वी च्या परीक्षा समाप्त झालेल्या असून इ.१० वी उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सन २०२३-२४ मधील प्रवेशाची कार्यवाही सुरु करणेबाबत संदर्भ पत्र क्र.२ अन्वये कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिये संदर्भात नवीन रजिस्ट्रेशन व कनिष्ठ महाविद्यालयाच्या माहितीत बदल करण्यासंदर्भात खालील वेळापत्रकाप्रमाणे शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे.

| दिनांक | वेळ | क्षेत्र |
|---|---|---|
| २६/०५/२०२३ | सकाळी १०.०० ते सायं. ५.३० | पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्र |
| २९/५/२०२३ | सकाळी १०.०० ते सायं. ५.३० | पुणे महानगरपालिका क्षेत्र |

स्थळ – एम. व्ही. युनियन कनिष्ठ महाविद्यालय, के.ई.एम. हॉस्पि. समोर, सोमवार पेठ पुणे

कनिष्ठ महाविद्यालय रजिस्ट्रेशन संदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

**कनिष्ठ महाविद्यालय रजिस्ट्रेशन - कनिष्ठ महाविद्यालयांसाठी दि. ३० /०५/२०२२ ते दि.०६/०६/२०२२ पर्यंत**

अ) नव्याने रजिस्ट्रेशन करावयाचे असल्यास शासन आदेश, विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे आदेश, जागेची कागदपत्रे, मुख्याध्यापक यांचे नाव, मोबाईल क्रमांक व इमेल आय डी इ.सह परिपूर्ण प्रस्ताव शिबिरात सादर करावा.

आ)ज्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या माहितीत काहीही बदल नाही त्या कनिष्ठ महाविद्यालयांनी शिबिरास येण्याची आवश्यकता नाही.

इ) ज्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या माहितीत बदल आहे त्या कनिष्ठ महाविद्यालयांनी बदल करण्यापूर्वीच्या संकेत स्थळावरील माहितीची प्रिंट काढावी. बदल करण्यासाठी आवश्यक मूळ कागदपत्रे (शासन आदेश, विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे आदेश) व त्यांची सुस्पष्ट व प्रमाणित सत्य प्रतींचा एक संच सादर करावा. सदर बदल प्रस्तुत कार्यालयाच्या स्तरावरून करण्यात येतील. बदलानंतरच्या माहितीची प्रिंट काढावी. केलेले बदल हायलाईट करावेत. दोन्ही प्रिंट व बदल करण्याबाबतची कागदपत्रे शिबिरात जमा करावेत.

ई) ज्या कनिष्ठ महाविद्यालयांना संकेतस्थळावर तात्पुरत्या स्वरुपात युडायस क्रमांक दिलेला आहे, त्यांनी त्यांचा युडायस क्रमांक सादर करावा. अन्यथा सदरचे कनिष्ठ महाविद्यालय संकेतस्थळावर activate होणार नाही.

उ) ज्या स्वयंअर्थसाहाय्यीत कनिष्ठ महाविद्यालयांना शुल्कात बदल करावयाचा असेल त्यांनी शासन पत्र दि.३१/१०/२०१८ व शुल्क विनियमन अधिनियम दि.१३/०४/२०१६ नुसार कार्यवाही करावी. व त्यानुसार कार्यवाही करून नस्ती शिबिरात सादर करावी. सदर दोन्ही पत्रे प्रस्तुत कार्यालयाच्या संकेतस्थळावर अपलोड केलेली आहेत.